**<u>ठळक बातम्या</u>**

- महायुती सत्तेत आल्यावर राज्याच्या विकासाचा वेग दुप्पट होईल, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- उद्योगपतींच्या माफ झालेल्या कर्जाइतकी रक्कम राज्यातले शेतकरी, कष्टकरी आणि गरिबांना देण्याचं काँग्रेस नेते राहुल गांधी यांचं आश्वासन
- दिवसअखेर शेअर बाजारात मोठी घसरण, सेन्सेक्स ७९ हजाराच्या, तर निफ्टी २४ हजार अंकांच्या खाली

  **आणि**

- कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूरात ३ लाख भाविक,  विभागीय आयुक्तांच्या हस्ते शासकीय महापूजा

**<><><><><>**

महायुती सत्तेत आल्यावर राज्याच्या विकासाचा वेग दुप्पट होईल, असं आश्वासन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिलं. ते आज चंद्रपूर जिल्ह्यातल्या **चिमुर** मतदारसंघात आयोजित प्रचारसभेला संबोधित करत होते. महायुती सरकारच्या कामगिरीची आढावा त्यांनी यावेळी घेतला. महायुतीची सत्ता आल्यावर सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ६ हजार रुपये हमीभाव दिला जाईल, असं आश्वासनही त्यांनी यावेळी दिलं.

महायुतीचं सरकार हवं, असा जनतेचा आवाज राज्याच्या कानाकोपऱ्यातून ऐकू येत असल्याचं प्रधानमंत्री **सोलापूरच्या सभेत म्हणाले.** काँग्रेस आरक्षण संपवण्याचा प्रयत्न करत असून विविध समाजात फूट पाडण्याचा, विविध जातींना आपापसात लढवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

**होल्ड बाईट ...सोलापूर मोदी ( २३ सेकंद)**

महाराष्ट्राला स्थिर आणि विकासाची दृष्टी असणाऱ्या सरकारची गरज असून महायुती सत्तेत आल्यावर दूरगामी योजना आखेल असं मोदी म्हणाले.

**<><><><><>**

महायुती सरकारने राज्यात गेल्या अडीच वर्षांमध्ये विविध समाज घटकांसाठी योजना राबवल्या आहेत. महाविकास आघाडीने सरकारने मात्र राज्याला वनवास दिला. पण, महायुतीने सुरू केलेल्या योजना मविआने बंद पाडण्याचा प्रयत्न केला, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रिसोड इथे केली. बुलडाणातल्या मेहकर इथं बोलताना महाविकास आघाडीतले नेते हे विकासाला विरोध करतात, अशी टीकाही त्यांनी केली.

**<><><><><>**

महायुतीचं सरकार कुणालाही उद्ध्वस्त करुन विकास करणार नाही. सर्वांना सोबत घेऊन जाणारं सरकार असं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. पालघर जिल्ह्यात डहाणूत ते प्रचारसभेत बोलत होते. वाढवण बंदरासारख्या मोठ्या प्रकल्पांच्या विरोधात खोटा प्रचार करून विकासात अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न विरोधी पक्ष करत असल्याचा आरोप त्यांनी केला. जल, जमीन आणि जंगलाचे रक्षण करण्याचं आश्वासन त्यांनी आदिवासींना दिलं. पालघरमध्ये विमानतळाची मागणी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मंजूर केली आहे. वाढवण बंदर, कोस्टल रोड, बुलेट ट्रेन यासारख्या प्रकल्पांमुळं पालघर विकासाच्या केंद्रस्थानी येणार असल्याचं ते म्हणाले.

पेणमध्ये बोलताना त्यांनी नमो शेतकरी सम्मान निधीच्या हप्त्यात वाढ, शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि २४ तास मोफत वीज यासारखी आश्वासन दिली.

**<><><><><>**

महाराष्ट्र आणि झारखंडमधल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्ष मतांसाठी फुटीरवादी शक्तींसोबत कटकारस्थान करत असल्याचा आरोप, भाजपानं केलं आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते रविशंकर प्रसाद यांनी आज नवी दिल्लीत बातमीदारांशी बोलताना हा आरोप केला. काँग्रेस आणि इंडिया आघाडीतले पक्ष संकोचित मनोवृत्तीचे असून, अल्पसंख्यकांच्या उन्नतीला देखील त्यांचा विरोध आहे,  असं ते म्हणाले.

**<><><><><>**

उद्योगपतींच्या माफ झालेल्या कर्जांच्या इतका पैसा राज्यातले शेतकरी, कष्टकरी आणि गरिबांना देण्याचं आश्वासन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिलं आहे. गोंदिया इथल्या प्रचारसभेत ते बोलत होते. आम्हाला अरबपतींचा नाही तर शेतकऱ्यांचा, कष्टकऱ्यांचा, तरुणांचा भारत हवा आहे, असं ते म्हणाले. देशात सर्वाधिक जीएसटी गरीबांच्या खिशातून जातो, असा दावाही त्यांनी केला.

**बाईटः राहुल गांधी.**

विविध समाज घटकांना देशाच्या निर्णयप्रक्रियेत, तसंच विविध क्षेत्रांमध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळत नाही. हा या समुदायांचा सर्वात मोठा अपमान असल्याची टीका त्यांनी केली. जातनिहाय जनगणना आणि आरक्षणावरची ५० टक्क्यांची मर्यादा हटवण्याच्या आश्वासनांचा पुनरुच्चार त्यांनी केला. महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यातल्या आश्वासनांची पूर्तता करण्याची हमी त्यांनी राज्यातल्या मतदारांना दिली.

ही विचारधारेची, राज्यघटनेची लढाई आहे. संविधान हे द्वेषाला प्रेमाने हरवण्याचा संदेश देणारं पुस्तक असल्याचं ते म्हणाले.

तत्पूर्वी, राहुल गांधींची चिखली इथली सभा विमानातल्या तांत्रिक बिघाडामुळे रद्द करण्यात आली.

**<><><><><>**

सत्ताधाऱ्यांचं शेतकऱ्यांकडे लक्ष नसल्याची टीका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली आहे. ते आज नाशिक जिल्ह्यात प्रचारसभेत बोलत होते. कांद्याचा भाव वाढला की सरकार निर्यातबंदीचा विचार करून कांद्याचे भाव पाडतं, शेतकरी कर्जबाजारी होतात, त्यांना कर्जमाफी मिळत नाही मात्र, १६ उद्योगपतींचं १४ हजार कोटी रूपयांचं कर्ज माफ केलं, असं पवार म्हणाले.

दिंडोरी इथं सभेत त्यांनी, विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ हे विश्वासघाती असल्याचा आरोप केला.

**<><><><><>**

महाविकास आघाडी सत्तेत आल्यावर डाळ, तांदूळ, गहू, साखर आणि तेल या जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवू असं आश्वासन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज लातूर जिल्ह्यात औसा मतदारसंघातल्या प्रचारसभेत दिलं. महायुती सरकारच्या काळात शेतमालाला हमीभाव मिळत नाही. महायुतीकडे कोणतेही मुद्दे नसल्याने ते दिशाभूल करत असल्याचं सांगत महाविकास आघाडीला सत्ता देण्याचं आवाहन ठाकरे यांनी केलं.

**<><><><><>**

काँग्रेस महाविकास आघाडीची सत्ता आल्यास शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह शेतकरीहिताचे निर्णय घेऊ, असं आश्वासन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिलं आहे. त्यांनी अकोट विधानसभा मतदार संघात प्रचार सभेत ते बोलत होते.

<><><><><>

देशातल्या शेअर बाजारात आज मोठी घसरण झाली. व्यवहार सुरू झाले तेव्हा तेजी असलेले शेअर बाजार नंतर घसरले आणि व्यवहार संपेपर्यंत ही घसरण वाढत गेली. त्यामुळं सेन्सेक्स ७८ हजारांच्या खाली आणि निफ्टी २४ हजारांच्या खाली बंद झाले. दिवसअखेर सेन्सेक्स ८२१ अंकांनी कोसळून ७८ हजार ६७५ अंकांवर बंद झाला. निफ्टी २५८ अंकांनी घसरुन २३ हजार ८८३ अंकांवर स्थिरावला.

<><><><><>

प्रबोधिनी एकादशी म्हणजेच कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूर इथल्या मंदिरात श्री विठ्ठल रखुमाईची शासकीय पूजा पुण्याचे विभागीय आयुक्त डॉक्टर चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते आज पहाटे करण्यात आली. लातूर जिल्ह्यातल्या उदगीरचे बाबूराव सगर आणि त्यांच्या पत्नी सागरबाई यांना महापूजेचा मान मिळाला. सगर दाम्पत्य गेली १४ वर्ष पंढरीची वारी करत आहे. कार्तिकी एकादशी निमित्त पंढरपूरमध्ये तीन लाखाहून अधिक भाविक दाखल झाले आहेत.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीत मविआने फेक नॅरेटिव्ह तयार केला होता. पण विधानसभेवेळी मतदारांनी हा डाव ओळखला आहे. त्यामुळे मुंबई, ठाण्यासह संपूर्ण

कोकणात महायुतीला साठहून अधिक जागा मिळतील, असा विश्वास भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी आज कणकवली इथे व्यक्त केला.

**<><><><><>**

अमरावती जिल्ह्यातल्या बडनेरा मतदारसंघाचे आमदार रवी राणा आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी महायुतीची शिस्त पाळायला हवी, महायुतीविरुद्ध काम करणं चालणार नाही, अशी ताकीद मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. अमरावतीत भाजपाचे उमेदवार जिंकायला हवेत, बाकीचे पराभूत झाले तरी चालतील, अशा आशयाचं विधान रवी राणा यांनी एका सभेत केलं होतं. त्यासंदर्भात ते बोलत होते.

रवी राणा विनाशकाले विपरित बुद्धी झाल्यासारखं वागत आहेत अशी टीका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. रवी राणा यांच्या भाषेमुळेच त्यांच्या पत्नी लोकसभेत पराभूत झाल्याचं पवार म्हणाले.

**<><><><><>**

राज्यात महायुती सरकारच्या काळात महिलांवरच्या अत्याचारात वाढ झाल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. त्या आज गडचिरोली जिल्ह्यात आलापल्ली इथं प्रचारसभेत बोलत होत्या.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने विविध ठिकाणी मतदार जनजागृती सुरू आहे. सांगली जिल्हा प्रशासनाच्या वतीनं मतदानाची टक्केवारी वाढावी मतदान जनजागृती व्हावी यासाठी बाईक रॅली काढण्यात आली. धुळे जिल्ह्यात शिरपूर नगरपालिकेनं मानवी साखळी तसंच रांगोळी स्पर्धांचं आयोजन केलं.

जळगाव शहर महानगरपालिकेतर्फे फलक लेखनाद्वारे मतदानाबाबत जनजागृती तसंच पथनाट्य, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा झाल्या.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज पुणे जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकणात आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी हवामान विभागानं पावसाची शक्यता  व्यक्त केली आहे.